सकाळ
वर्धा
गुरुवार, ९ फेब्रुवारी २०२३

# विदर्भस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा

▸ सकाळ वृत्तसेवा

वर्धा, ता. ८ : वेलफेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित औषधीनिर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था बोरगाव (मेघे), वर्धा. या महाविद्यालयात प्रा. राम मेघे स्मृति प्रित्यर्थ विदर्भ स्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पेर्धेचे आयोजन करण्यात आले. वादविवाद स्पर्धेचा विषय "नवीन शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी फायदेशीर आहे" हा होता.

वादविवाद स्पर्धेचे उद्धाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.ओ. गंजीवाले यांच्या हस्ते स्वर्गीय प्रा. राम मेघे यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आले. या प्रसंगी पदविका अभ्यासक्रमाचे प्राचार्य डॉ. भूषण कुमार साठे व वादविवाद स्पर्धेचे परीक्षक जी. एस. कॉमर्स कॉलेजचे प्राध्यापक डॉ. योगेश पतिंगे व प्रा. डॉ. अनुपमा लाभे मंचावर उपस्थित होते. डॉ. आर. ओ. गंजीवाले यांनी वादविवाद स्पर्धेच्या आयोजनाची भूमिका स्पष्ट केली.



वर्धा : विजेत्यांना पुरस्कार देताना मान्यवर.

या वादविवाद स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाला स्कूल ऑफ लॉ. रायसोनी ग्रुप ऑफ एड्युकेशन नागपुर येथील संचालक मा. डॉ. ॲड. अशोक पावडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच प्रा. भूषणकुमार साठे व वादविवाद स्पर्धेचे परीक्षक मंचावर उपस्थित होते. विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे वितरीत करण्यात आली. आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेमध्ये विदर्भातील विविध महाविद्यालयातील १७ चमुंनी सहभाग घेतला होता.

या वादविवाद स्पर्धेतील विजेती चमू डॉ. आर. जी भोयर औषधीनिर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था नालवाडी, वर्धा चे विद्यार्थिनी साक्षी निकोडे व श्रेया काकडे ठरली त्यांना फिरते चषक व प्रशस्ती पत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. तसेच उपविजेती चमू इंस्टीट्यूट ऑफ फार्मसी ॲण्ड रिसर्च बडनेरा येथील विद्यार्थी गौरी कालमेघ व नतीसा हुसेन यांना फिरते चषक व प्रशास्ती पत्र देवून सन्मानित करण्यात आले. वैयक्तिक पारितोषिकामध्ये डॉ. आर. जी भोयर औषधीनिर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था नालवाडी वर्धा येथील विद्यार्थी साक्षी निकोडे हिला प्रथम पारितोषिक देण्यात आले. द्वितीय परितोषिक इंस्टीट्यूट ऑफ फार्मसी ॲण्ड रिसर्च वडनेरा येथील विद्यार्थी गौरी कालमेघ हिने पटकाविले.

तसेच तृतीय पारितोषिक डॉ. आर. जी भोयर औषधीनिर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्थेची श्रेया काकडे हिने पटकाविले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. गिरीश दहीकर व प्रा. डॉ. मनीषा पुराणिक यांनी केले. प्रा. जी. डी. दहीकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

The Hitavada
NAGPUR ■ Friday ■ February 10 ■ 2023

# Vid-level Inter-Collegiate Debate Competition organised at IPER

■ District Correspondent
WARDHA, Feb 9

VIDARBHA-LEVEL debate competition was orginised at Institute of Pharmaceutical Education and Research (IPER) Borgaon (Meghe), Wardha, in the memory of Prof Ram Meghe, ex-Education Minister. The subject of debate competation was News Education Policy 2020 is Beneficial for the Academic Devlopment of the Students Debate competition was inaugurated at the hands of Principal Dr R O Ganjiwale, Dr Bhushankumar Sathe, and the guest Dr Yogesh Patinge and Dr Anupama Labhe.

The prize distribution ceremony was held in the presence of Dr Adv Ashok Pawade Director of School of Law, Raysoni Group of Education Nagpur, Dr R O Ganjiwale and Dr B S Sathe. The prizeses were distributed to the winning teams at the hands of dinitaries About 17 teams from the various colleges of Vidarbha participated in the competition.



Winners along with the guests.

The winners Sakshi Nikode and Shreya Kakde of Dr R G Bhoyar Institute of Pharmaceutical Education and Research, Wardha, was awarded by a trophy and certificate of participation. The runners up team Gauri Kalmegh and Namita Hussain of Institute of Pharmaceutical Education and Research, Badnera, was presented runners-up trophy and certificate of participation.

The first individual prize of Rs 5,001was won by Sakshi Nikode, student of Dr R G Bhoyar Institute of Pharmaceutical Education Research, Wardha. The second prize of Rs 3,001 was won by Gauri Kalmegh and Natima Hussain of Instiute of Pharmaceutical Education and Research, Badnera, and third individual prize of Rs 2,001 was bagged by Shreya Kakde of Dr R G Bhoyar Institute of Pharmaceutical Education and Research, Wardha.

Girish Dahikar and Dr Manisha Puranik conducted the proceedings while G D Dahikar proposed a vote of thanks. Dr R O Ganjiwale made an introductory remark.

TheHitavada
NAGPUR ■ Friday ■ March 24 ■ 2023

# 'Fest 2023' organised in IPER, Wardha

■ **District Correspondent**
WARDHA, Mar 23

INSTITUTE of Pharmaceutical Education and Research (IPER), Borgaon (Meghe) Wardha celebrated their annual day 'Fest 2023'. The programme was presided over by Dr Nitinji Dhande, President of Vidarbha Youth Welfare Society, Amravati.

Avinash Kondawar, Senior Manager, Clinical Trial Management ICON Clinical Research, Bangalore, and Nitin Bhimte Head Intellectual Property Rights (Formulations) Alembic Pharmaceuticals Ltd. Hyderabad were Guest of Honour, Principal of the College Dr Rajendra Ganjiwale and IDP Principal Dr Bhushan Kumar Sathe, Fest In-charge Dr Lalit Rathi and all the student members of Pharmacy Students Association were present on the dias.



A guest being felicitated at the hands of the dignitorious.

The programme started by lighting a traditional lamp and university song. The introductory speech of the programme was given by the Dr Rajendra Ganjiwale. Distinguished guests alumni of the IPER Avinash Kondawar and Nitin Bhimte shared their old memories with the students.

Dr. Nitinji Dhande in his presidential speech congralutated the meritorious students and honored them by giving a prize and appreciation certificate. Dignitaries on the dais Nitin Bhimte and Avinash Kondawar were felicitated at the hands of Dr Nitinji Dhande.

For the prize distribution programme, Dr Prafulla Sable Director of Board of examination and evaluation RTMNU Nagpur and Mr Naveen Mungle Deputy Registrar (Pre-Exam) RTMNU Nagpurwere present. Various cultural programmes were organised including dance, drama, fashion show and poster competition. The programme was conducted by Dr Manisha Puranik and Prafulkumar Rawal proposed a vote of thanks.

The programme was concluded by National Anthem. For the success of the programme teaching staff member Dr Lalit Rathi, Dr Nilesh Karande, Sadhana Gautam, Abhiram Deshmukh, G D Dahikar, S P Dewani, and non-teaching staff member V M Dahiwalkar, P B Ankar, N J Sontakke, G P Jarwarkar, Mr D C Deotale, S K Deodhe worked hard.

लोकमत
epaper.lokmat.com
शुक्रवार, दि. २४ मार्च २०२३

# आयपरमध्ये गुणवतांचा सत्कार




लोकमत न्यूज नेटवर्क

**वर्धा :** औषधी निर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्था, बोरगाव (मेघे) येथे वार्षिक स्नेहसंमेलन पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे तर पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी अविनाश कोंडावार, नितीन भिमटे, प्राचार्य डॉ. राजेद्र गंजीवाले, आयडीपीचे प्राचार्य डॉ. भूषणकुमार साठे, फेस्ट इनचार्ज डॉ. ललित राठी उपस्थित होते. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व विद्यापीठ गीताने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजेंद्र गंजीवाले यांनी केले. अविनाश कोंडावार व नितीन भिमटे यांनी विद्यार्थ्यांना जुन्या आठवणी सांगून भविष्यात येणाच्या आव्हानाला कसे सामोरे जायचे यावर मार्गदर्शन केले. डॉ. नितीन धांडे यांनी गुणवत्ता यादीत आलेल्या पूजा ईखार डी. फार्म. प्रथम, प्रथम चांडक डी. फार्म. द्वितीय, चेतन बोटे बी फार्म. प्रथम, साक्षी झाडे बी. फार्म. चतुर्थ, वैष्णवी राऊत जी. पॅट टॉपर बी. फार्म. चतुर्थ, मेघना चव्हाण एम फार्म प्रथम, सोनाली डेरकर एम. फार्म. द्वितीय या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. पाहुण्यांचा शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. फेस्ट २०२२ चे दरम्यान डान्स, ड्रामा, फैशन शो पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. बक्षिक वितरण समारंभाला परीक्षा व मूल्यांकन विभाग रा. तु. म. नागपुर विद्यापी संचालक डॉ. प्रफुल सावळे , रा. तू. म. विद्यापीठ नागपुरचे कुलसचिव (पूर्व परीक्षा)डॉ. नितिन मुंगळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. मनीषा पुराणिक यांनी केले व आभार प्रदर्शन प्रफुलकुमार रावल यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. ललित राठी, डॉ. नीलेश करंडे, प्रा. साधना गौतम, प्रा. अभिराम देशमुख प्रा. जी. डी. दहिकर, प्रा. देवानी, व्ही. एम दहिवलकर यांनी परिश्रम घेतले.

# चिंतामणी महाविद्यालयात शहिदांना श्रद्धांजली

लोकमत न्यूज नेटवर्क

**वर्धा :** येथील चिंतामणी शारीरिक शिक्षण महाविद्यालय व नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फायर इंजिनिअरिंग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यानगरस्थित महाविद्यालयाच्या शहर कार्यालयात शहीद दीन आयोजित करण्यात आला होता.

यावेळी शहीद भगतसिंग यांच्या प्रतिमेला संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र शर्मा यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर दीप प्रज्वलन करुन कार्यक्रमाला सुरुवात झाली. तसेच संस्थेचे सहसचिव प्रमोद पोतदार, प्रा. वसंत लोटिया, प्राचार्य अनंत गवडी, स्नेहा शर्मा यांनी माल्यार्पण केले. यावेळी महाविद्यालयातील प्रा. मंगला बुराडे, प्रा. देवदत्त चिमलवार, प्रा. मुकुंद दुर्गे, प्रा. शंकर तडस, प्रा. संदेश गुजरकर, प्रा. विनायक ठाकरे, प्रा. सौरभ खंते, फातिमा शेख, पी. राऊत, अमोल बोकडे, चंद्रशेखर महल्ले, अभिशेष अलोने, कुंदन वनकर, मिलिंद ताराचंदी यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

TheHitavada
NAGPUR ■ Monday ■ April 3 ■ 2023

# PTM organised at IPER

■ District Correspondent
WARDHA, Apr 2

PARENTS teacher meet (PTM) was organised by Institute of Pharmaceutical Education and Research (IPER), Borgaon (Meghe), Wardha, for the students of B Pharm-I year.

The main objective of this meeting was to provide a platform where teachers and parents come together to discuss students' performances as well as for teachers to share information for the development of the students.

Sunil Loya and Archana Chopane, Parents' Representative and Dr RO Ganjiwale, Principal were present on the stage.

Dr Rathi highlighted on the different achievements of the college, current admissiion position, results and discussed teaching and learning process. An interaction between teachers and the parents regarding performances of students was also held.



Dignitaries being felicitated at the PTM.

Dr Ganjiwale addressed the meet and introduced the faculty members to the parents. He guided on the various facilities available in the institute. He also explained how a PTM encourages and promotes a good relationship among the teaching faculties, students and parents. A total of 22 parents were present in the meeting.

Dr Jayashri Wankhede conducted the meeting.

लोकमत
epaper.lokmat.com
मंगळवार, दि. ४ एप्रिल २०२३

# विद्यार्थ्यांच्या विकासासाठी आयपर कटिबद्ध

## राजेंद्र गंजीवाले : आयपर येथे पालकांशी साधला संवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**वर्धा :** औषधी निर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था बोरगाव मेघे वर्धा या महाविद्यालयात पालक सभेचे आयोजन करण्यात आले. पालक सभेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्र गंजीवाले होते. यावेळी पालक प्रतिनिधी सुनील लोया, अर्चना चोपणे उपस्थित होते.

पालक सभेची सुरुवात दीप प्रज्वलन करून करण्यांत आली याप्रसंगी प्रास्ताविक डॉ.



ललित राठी यांनी केले उपस्थित पालक प्रतिनिधी अष्टपुत्रे इतर पालकांनी मनोगत व्यक्त केले.डॉ. राजेंद्र गंजीवाले यांनी पालक सभेचे मूळ उद्दिष्ट नमूद करून पालकांनी विचारलेल्या प्रश्नांचे समाधानकारक निरसन केले. महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहे, असे सांगून महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या हितार्थ राबविलेले कार्यक्रम सुविधांबाबत पालकांना अवगत केले. संचालन प्रा. जयश्री वानखडे यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. साधना गौतम, गिरीश दहीकर, डॉ. नीलेश करंडे यांनी सहकार्य केले. यावेळी पालकांच्या प्रश्नांना डॉ. गंजीवाले यांनी उतर देवून त्यांचे समाधान केले.